RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ०८ ] शनिवार, डिसेंबर १३, २०२५ / अग्रहायण २२, शके १९४७ [ पृष्ठे ०३

## असाधारण क्रमांक ०८

## प्राधिकृत प्रकाशन

### आयुक्त तथा प्रशासक यांजकडून

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

*सोलापूर शहराच्या प्रारूप विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये केलेल्या बदलांचे व नकाशाचे प्रसिद्धीकरण*

### सूचना

क्रमांक न.आ./वै./८४९/ससंनर/२५/२०२५.—ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, चे कलम २६ *(१)* नुसार सोलापूर महानगरपालिका संपूर्ण क्षेत्राची प्रारूप विकास योजना सुधारित करून ती दिनांक २७ डिसेंबर २०२४ चे सुचनेद्वारे नागरिकांच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. सदरची सूचना दिनांक जानेवारी २-८, २०२५ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र, पुणे विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये आणि स्थानिक वृत्तपत्रामध्ये जनतेकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेवर विहित मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(२)* नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दिनांक १६ जुलै २०२५ रोजी सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने, तो मान्य करून, उक्त प्रारूप विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ *(४)* अंतर्गत फेरबदल/बदल करण्यासाठी व सदर फेर बदलांसह उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्रमांक २३४, दिनांक १५ सप्टेंबर २०२५ ने पारित केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर पर्जन्यजल / पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाने सादर केलेल्या सोलापूर शहराच्या शहर आपत्ती व्यवस्थापन आराखडा व तांत्रिक सर्व्हेक्षण अहवालानुसार, शहर आपत्ती व्यवस्थापन समितीने सक्षम मंजुरी प्रदान केलेले नाले दर्शविण्यात आलेले आहेत. तसेच, मौजे मजरेवाडी सर्वे क्रमांक १२९ व १३० मधील वसुंधरा कला महाविद्यालयाच्या उत्तरेस असलेला पूर्व-पश्चिम दिशेचा १२ मीटर रुंदीचा रस्ता दर्शविणे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा जिल्हा अभियान संचालक एमएसआरएलएम, सोलापूर यांच्या मागणी अन्वये व जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार सोलापूर शहरातील रेल्वे लाईन सि.स.नं. ८४०७, क्षेत्र १४०० चौ.मी. सरकारी पड जागेवरील गार्डन वापर बदलून रहिवास वापर दर्शविणे आवश्यक असल्याने, प्रशासकीय ठराव क्रमांक २४७, दिनांक २४ सप्टेंबर २०२५ मध्ये आवश्यक सुधारणा करून त्यास मान्यता देण्यात आली.

त्याअर्थी उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ *(४)* नुसार खालीलप्रमाणे केलेला फेरबदल प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर दर्शवून नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर फेरबदल/बदल निळया रंगाने उक्त प्रारूप विकास योजनेत दर्शविण्यात आले असून सदर नकाशा आयुक्त, महानगरपालिका, सोलापूर यांचे कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला असून, महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहे.

**प्रारूप विकास योजना सोलापूर**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ *(४)* अंतर्गत फेरबदल**

| बदल क्रमांक | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ *(४)* अंतर्गत फेरबदल |
|---|---|
| एम-१५० | प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर सोलापूर शहराचा शहर आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास शहर आपत्ती व्यवस्थापन समितीने सक्षम मंजुरी प्रदान केलेल्या नाल्यांना दर्शविण्यात आलेले आहे. |
| एम-१५१ | मौजे मजरेवाडी सर्वे क्र. १२९ व १३० मधील वसुंधरा कला महाविद्यालयाच्या उत्तर सीमेने १२ मी. रुंद नवीन पूर्व-पश्चिम रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. |
| एम-१५२ | सोलापूर शहरातील रेल्वे लाईन सि. स. नं. ८४०७, क्षेत्र १४०० चौ.मी. सरकारी पड जागेवरील गार्डन वापर रद्द करण्यात आला आहे व तो राहिवास विभागात समाविष्ट करण्यात आला आहे. |

**डॉ. सचिन ओम्बासे** (भा.प्र.से.),
आयुक्त तथा प्रशासक,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

सोलापूर, १२ डिसेंबर २०२५.

---

**BY COMMISSIONER AND ADMINISTRATOR**

**SOLAPUR MUNICIPAL CORPORATION, SOLAPUR**

*Publication of Draft Modifications / Changes in Draft Development Plan of Solapur Municipal Corporation Under Section 28* (4) *of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

**NOTICE**

क्रमांक न.आ./वै./८४९/ससंनर/२५/२०२५.—Whereas, Solapur Municipal Corporation, being Planning Authority, has published the Draft Development Plan of Solapur Municipal Corporation under Section 26 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, *vide* notice dated 27th December 2024 for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Pune Division, Supplement Part-1, dated January 2-8, 2025 ;

and whereas, after considering the suggestions/objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee constituted under Section 28 *(2)* of the said Act, has submitted it's report to the said Planning Authority on 16th July 2025 ;

and whereas, the said Planning Authority after considering the report submitted by Planning Committee, passed Administrative Resolution No. 234, dated 15th September 2025 to make modifications/changes in the said Draft Published Plan and to submit the said Plan along with the said modification for sanction to the Government under Section 30 of the said Act ;

and whereas, the Existing /village plan Nalas (hereinafter referred to as the said modification) approved by the City Disaster Management Committee, based on the Solapur City Disaster Management Plan and Technical Survey Report submitted by the Storm Water/Flood Control Survey Team, have been shown on the Draft Development Plan; and it is also essential to show the proposed 12-meter wide East-West road along the northern boundary of Vasundhara College of Arts located in Sr. Nos. 129 and 130 of Mauje Mazarewadi and to change the land use of the Government open land bearing Railway Line C.S. No. 8407, admeasuring 1400 sq.mtrs., from Garden to Residential use, as requested by the Chief Executive Officer, Zilla Parishad and District Mission Director, MSRLM, Solapur, and as communicated by the District Collector. Solapur. Therefore, the necessary modification has been approved by incorporating the same in the Administrative Resolution No. 247 dated 24th September 2025.

Now, therefore, the said modifications made under Section 28 *(4)* of the Act, by the said Planning Authority is hereby published as shown on the Draft Plan along with showing the said modifications in blue colour in the said Draft Development Plan for information and is kept open for the inspection of the public in the office of Commissioner, Solapur Municipal Corporation Solapur on working days. during office hours and is also available on official website.

**DRAFT DEVELOPMENT PLAN, SOLAPUR**

**MODIFICATION PROPOSED UNDER SECTION 28 *(4)* OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966**

| Modification Nos. | Modification Made by Planning Authority under Section 28 *(4)* of Maharashtra Regional and Town Planning ACT, 1966 |
|---|---|
| 1 | 2 |
| M-150 | All Existing/Village Plan Nalas approved by the City Disaster Management Committee based on the Solapur City Disaster Management Plan are marked on the Draft Development Plan Solapur as shown on plan. |
| M-151 | New 12 meter wide East-West road is proposed along the northern boundary of Vasundhara College of Arts, situated in S. No. 129 and 130 of Mauje Mazarewadi as shown on Plan. |
| M -152 | The Garden land use on the Government open land bearing Railway Line C.S. No. 8407, admeasuring 1400 Sq.m. is deleted and the said land is included in the Residential Zone. |

**DR. SACHIN OMBASE** (I.A.S.),
Commissioner and Administrator,
Solapur Municipal Corporation, Solapur.

Solapur, 12th December 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.